जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.१४/०९/२०२३
## दि.१३/०९/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | खडक पो स्टे ३०६/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६, ३४ |
| **फिर्यादी** | मोईनुदिन कुरेशी,वय २२ वर्षे,रा.६११ भवानी पेठ,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१३/०९/२०२३ रोजी ०२/०० वा.पाटील चौक काशेवाडी भवानी पेठ,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे बालाजी वेपर्स,नाना पेठ येथे वेपर्सचा कंन्टेनर खाली करून माल गोडाऊन मध्ये लावुन येत असताना,यातील नमुद इसमांनी जुन्या भांडणाचे कारणावरून फिर्यादी यांना शिवीगाळ करून,इसको बहोत चर्बी आ गयी हैं,आज इसको दिखाते हैं गण्या क्या चिज हैं असे म्हणुन फिर्यादीस जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने रस्त्याच्या बाजुला पडलेला सिंमेंटचा प्लेव्हर ब्लॉक फिर्यादीच्या डोक्यात डाव्या बाजुला मारून,त्यांना गंभीर जखमी करून,त्यांना लाथा-बुक्यांनी मारहाण करून जीवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अभिजीत पवार ८३०८७८२७९७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ६२६/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३१ वर्षे,रा.१९१,नागपुर चाळ,येरवडा,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी रात्री १०/३० वा.साईनाथ जनरल स्टोअर जवळ,नागपुर चाळ, येरवडा,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पायी जात असताना,नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जवळील ७०,०००/- रू किमतीचा मोबाईल फोन जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अंकुश डोंबाळे ९८२३५५६७१३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५८२/२०२३,भादविक ४५२,३२६,३२४,३२३,४२७,५०४,५०६(२),३४, महा.पो.का.क.३७(१)१३५, आर्म ॲक्ट ४(२५) |
| **फिर्यादी** | ओंकार ठुले,वय-२३ वर्षे,रा.सुतारदरा,पौड रोड,शिवासाईनगर,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर दोन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १२/०९/२०२३ रोजी १९/०० वा. सनब्राईट शाळे जवळ,ब्लिंकींट स्टोअर जवळ,आंबेगाव बुद्रुक-पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे काम संपवुन घरी जाण्यासाठी स्टोअरचे बाहेर आले असताना,त्यांचे स्टोअर मध्ये पुर्वी काम करणारा यातील नमुद इसम व त्याचे इतर साथीदार यांनी संगनमत करून,नमुद इसम यांचे पेमेंट का दिले नाही याकारणावरुन फिर्यादीस धक्का देवुन त्यांचे स्टोअर मध्ये जबरदस्तीने घुसुन,स्टोअरची तोडफोड करून,फिर्यादीस शिवीगाळ करून,त्यांना |

| | |
|---|---|
| | लाथा-बुक्यांनी मारहाण करून,पगार दिला नाहीतर मालकास जीवंत सोडणार नाही असे म्हणुन जीवे मारण्याची धमकी देवुन,त्यांचेजवळील कोयत्याने उलट्या बाजुने फिर्यादीचे हातावर जबर मारून,लोखंडी रॉडने त्यांचे हातावर व पायावर मारुन जबर दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, कुलदीप व्हटकर ९५०३२४६५५५ |
| **५** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | चंदननगर पो स्टे ४३०/२०२३,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ४२ वर्षे,रा.केसनंद रोड,वाघोली,पुणे |
| **आरोपीत** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/२०२३ रोजी २२/१५ वा.समर्थनगर कॉर्नर,तुळजाभवानीकडे जाणा-या रोडवरती, खराडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी जाण्याकरीता ओला कार बुक करीत असताना,यातील नमुद इसमांनी दुचाकीवरून त्यांचे जवळ येवुन,फिर्यादी यांचे जवळील मोबाईल फोन २५,०००/- रु किंचा जबरी चोरी करून नेला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. अरविंद कुमरे ९५५२५३८३७१ |
| **६** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | हडपसर पो स्टे १३७०/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक नागरीक,वय ३२ वर्षे,रा.गल्ली नं.१०,वानवडी,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक १३/०९/२०२३ रोजी दुपारी १६/३५ वा.ते १६/५० वा.चे दरम्यान इंदीरा वसाहत ते हडपसर गाडीतळ व मगरपट्टा चौक बस स्टॉप,हडपसर असा पी.एम.पी.एम.एल.बस मधुन प्रवासा दरम्यान |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया मनपा पीएमपीएमएल बसने इंदीरा वसाहत ते हडपसर गाडीतळ व मगरपट्टा चौक बस स्टॉप,हडपसर असा प्रवास करीत असताना,सदर प्रवासा दरम्यान कोणीतरी अज्ञात व्यक्तीने,बस मधील गर्दिचा फायदा घेवुन,फिर्यादी यांचे जवळील बॅगेची चेन उघडुन,त्यामधील छोटया पर्स मधील सोन्याचे दागिने ८२,१००/- रु किमतीचे चोरी करून नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, आर.पी.बारटक्के ७०३८९१२३४९ |
| **७** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | सिंहगड पो स्टे ४३८/२०२३,भादविक २७९,३०४(अ),१३२(१)(क)/१७९ |
| **फिर्यादी** | रामकुमार निसाद,वय-२७,रा.हमीदपुर,कैसरगंज,राज्य उत्तर प्रदेश |
| **आरोपीत** | ट्रकवरील चालक (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.१२/०९/२०२३ रोजी २३/४० वा.नारायण शेठ जोरी यांचे मालकीचे सविता मंडपचे बारंगणी मळा धायरी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा नातेवाईक अर्जुन कृपाराम निसाद,वय-२६,रा.हमीदपुर,कैसरगंज,राज्य-उत्तर प्रदेश हा नारायण शेठ जोरी यांचे मालकीचे सविता मंडपचे बारंगणी मळा धायरी,पुणे येथील गोडावुन मध्ये बांबुचे जवळ झोपला असताना,नमुद ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक हा हयगयीने व अविचाराने चालवुन,त्याचे ट्रकचे क्लिनर बाजुकडील पाठीमागील चाक अर्जुन निसाद याचे डोक्यावरून घालुन,त्यास गंभीर जखमी करून,त्याचे मृत्युस कारणीभुत झाला आहे. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, भरत चंदनशिव ९६२३३१४१२७ |
| **८** | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | भारती विद्यापीठ पो स्टे ५८१/२०२३,भादविक ३७९ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-३९ वर्षे,रा.सदाशिव पेठ,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२९/०८/२०२३ रोजी सकाळी ११/३० वा.ते दि.०१/०९/२०२३ रोजी सकाळी ०९/३० वा.चे दरम्यान कात्रज ब्रिजवरुन,कात्रज कोंढवा रोड,कात्रज,पुणे येथुन |

| | |
|---|---|
| **तपशिल** | वर नमुद केले ता वेळी व ठिकाणी असलेले पुणे महानगरपालिकेचे जुने गॅल्वनाईज ऑक्टोगोनल स्ट्रीट लाईट पोल १४ नग ७०,०००/- रु किचे कात्रज ब्रिजवर,कात्रज-कोंढवा रोड,कात्रज,पुणे येथे ठेवले असताना,ते कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस अंमलदार, भोसले ९५५२५५२२३० |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**